आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१९ मे २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गेल्या दशकभरात नॉर्डिक देशांमधून भारतात होणारी गुंतवणूक दुप्पट, तर द्विपक्षीय व्यापार चौपट वाढल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं तिसऱ्या भारत-नॉर्डिक शिखर परिषदेत प्रतिपादन

- अणुऊर्जा निर्मितीसाठी राज्य सरकारचे चार कंपन्यांशी सामंजस्य करार, २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा आणि १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित

- पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ९० पैसे वाढ

**आणि**

- माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांचं निधन

**<><><><><>**

गेल्या दशकभरात नॉर्डिक देशांमधून भारतात होणारी गुंतवणूक २०० टक्क्यानी वाढली असून द्विपक्षीय व्यापारही चौपट वाढल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. नॉर्वेची राजधानी ओस्लो इथं संयुक्त निवेदन करताना ते आज बोलत होते. हे संबंध अधिक दृढ करण्यासाठी महत्त्वाची पावलं उचलल्याचं मोदी म्हणाले.

भारत आणि नॉर्डिक देश यांच्यात संशोधन आणि नवोन्मेष भागीदारी दृढ केली जाईल असंही मोदी म्हणाले.

**होल्ड बाईट मोदी**

तिसरी भारत-नॉर्डिक शिखर परिषद आज नॉर्वेची राजधानी ओस्लो इथं झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह नॉर्वे, स्वीडन, आयलँड, फिनलँड आणि डेन्मार्कचे प्रधानमंत्री या परिषदेत सहभागी झाले.

या परिषदेआधी मोदी यांनी आयलँड, फिनलँड, डेन्मार्क या देशांच्या प्रधानमंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा केली. आपल्या दौऱ्याच्या पाचव्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी आज इटलीला रवाना होतील. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात अणुऊर्जा निर्मितीसाठी राज्य सरकारनं चार कंपन्यांशी आज सामंजस्य करार केले. एनटीपीसीएल, अर्थात राष्ट्रीय औष्णिक उर्जा महामंडळ, अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि बजाज उद्योग समूहाच्या ललितपुर पावर जनरेशन कंपनी लिमिटेड या चार कंपन्यासोबत सुमारे साडेसहा लाख कोटी रूपये गुंतवणुकीचे हे सामंजस्य करार आहेत. यातून २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा, तसंच १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला 'ऊर्जा संपन्न' राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास फडनवीस यांनी यावेळी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करायला इच्छुक असलेल्या कंपन्यांना राज्य शासन संपूर्ण सहकार्य देईल, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी पारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावेही उपस्थित होते.

**<><><><><>**

शेतकऱ्यांनी रासायनिक खतांवरचं अवलंबित्व कमी करण्यासाठी सेंद्रिय शेतीवर अधिक भर देण्याचं आवाहन केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज केलं. भुवनेश्वर इथे पूर्व विभागीय कृषी परिषदेला ते संबोधित करत होते. जागतिक पातळीवर तणाव असूनही शेतकऱ्यांना पुरेसा खतपुरवठा करण्यासाठी केंद्र सरकार

सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय बाजारातून खतं मिळवणं दिवसेंदिवस कठीण होत चाललं आहे, असंही चौहान यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

नीट युजी परीक्षेचा पेपर फुटल्याप्रकरणी लातूरच्या RCC क्लासच्या संचालकाच्या अल्पवयीन मुलाचीही सीबीआय कसून चौकशी करत आहे. या मुलानं यंदा नीट परीक्षा दिली होती. CBI च्या पथकानं काल आणि आज क्लासची झडती घेऊन विविध कागदपत्रं आणि शैक्षणिक साहित्याची तपासणी केली.

दरम्यान, शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी या दोघांच्या विरोधात आज लातूरमध्ये मनसेनं निदर्शनं केली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी क्लाससमोर अंडी फेकली, आणि विद्यार्थ्यांनी भरलेलं शुल्क त्यांना परत करावं, अशी मागणी केली.

**<><><><><>**

भामरागड एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत दुर्गम आणि आदिवासी भागातल्या २६ विद्यार्थ्यांची निवड नीट आणि जेईई च्या विशेष मोफत प्रशिक्षणासाठी करण्यात आली आहे. त्यात नीट परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी ११ मुलं, १४ मुली तर जेईई परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी एका मुलीची निवड केली आहे. मार्च २०२६ ला दहावीची परीक्षा दिलेल्या आणि वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची २२ मार्चला चाचणी परीक्षा झाली. यात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची या मोफत प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. पुढची दोन वर्षं मुलांना हिंगोली जिल्ह्यातल्या शिरड शहापूर इथल्या शासकीय आश्रमशाळेत तर मुलींना वर्धा जिल्ह्यातल्या सिंदी रेल्वे इथल्या आश्रमशाळेत प्रशिक्षण दिलं जाईल.

**<><><><><>**

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात आज प्रति लिटर ९० पैसे वाढ झाली. एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीतली ही दुसरी दरवाढ आहे. दिल्लीमध्ये आता पेट्रोलचा दर ९८ रुपये ६४ पैसे, तर डिझेल ९१ रुपये ५८ पैसे, झाला आहे, तर मुंबईत पेट्रोल १०७ रुपये ५९ पैसे दराने आणि डिझेल ९४ रुपये ८ पैसे दराने मिळत आहे.

अमेरिका आणि इस्राएलनं इराणमध्ये छेडलेला संघर्ष आणि त्यामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या तेल वाहतुकीत आलेला व्यत्यय, यामुळे जगभरात कच्च्या तेलाच्या किमतीने उसळी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ झाली.

**<><><><><>**

आखाती संकटानंतर इंधन बचत, परकीय चलनाचं रक्षण आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देण्यासाठी एकसंध होण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. यासंदर्भात त्यांनी समाजमाध्यमावर एक व्हिडिओ जारी केला आहे. जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी राष्ट्र प्रथम या भावनेनं सर्व नागरिकांना एका राष्ट्रीय अभियानात सहभागी होण्याचं आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले…

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस**

**<><><><><>**

पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे. सरकार जनतेची लूट करत असून विशिष्ट उद्योगपतींनाच सूट देत आहे असा आरोप त्यांनी केला. जनतेला काटकसरीचा सल्ला देऊन सरकार जनतेवर महागाईचा भार टाकत आहे, अशी टीका खरगे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात केली.

तर, भाजपानं या वाढीचं समर्थन केलं असून ही दरवाढ इतर देशांपेक्षा कमी असल्याचं म्हटलं आहे. इंधन दरवाढीचा फटका जगातल्या सर्वच देशांना बसला आहे, तरीही भारतात इंधन दरात केवळ चार टक्के वाढ झाली आहे, असं भाजपाच्या आयटी विभागाचे प्रमुख अमित मालवीय यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><>

माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांचं आज देहराडून इथं प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. १९५४ मधे लष्करात दाखल होऊन ते १९९१ मधे  मेजर जनरल पदावरुन निवृत्त झाले. १९८३ मधे त्यांना अतिविशिष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आलं होतं. त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश करत गढवाल मतदारसंघाचं लोकसभेत प्रतिनिधित्व केलं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग खात्याचं मंत्रीपद त्यांनी सांभाळलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळातला सुवर्ण चतुष्कोण प्रकल्प त्यांच्या कार्यकाळात साकार झाला. २००७ ते २००९ आणि २०११ ते २०१२ असे दोन वेळा ते उत्तराखंडचे मुख्यमंत्री होते.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होणार आहे. जयपूरमधे थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

गेल्या २४ तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली, तर कोकणात तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली. राज्यात

सर्वात जास्त कमाल तापमान वर्धा इथं ४६ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//